MHKO100009522018

## रे.क.नं. २०५/२०१८ मधील निशाणी क्र. ५८ वरील आदेश

**१.** वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.४ यांचे विरुध्द वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**३.** वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ४ बाबुराव लक्ष्मण उपराटे हे दिनांक १४/१०/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. प्रस्तुतकामी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब झालेला आहे. वादी यांनी प्रतिवादींचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. सदरचे काम गुणदोषावर चालून निर्णय देणेस मदत होणकरीता मयत प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस रेकॉर्डवर येणे अत्यंत गरजेचे आहे. सबब वादी यांनी प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेची विनंती केली आहे.

**४.** प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे सादर करुन अर्जातील मजकुर नाकारला आहे. वादी हे प्रतिवादी यांना त्रास देणेसाठी सदर कामी हेतुपुरस्सर टाळाटाळ करीत आहेत. सबब अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

**५.** वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द वाटपाकरीता व कायम मनाई ताकीदीकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे.

प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत होणार आहे. म्हणून मी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक १८/०१/२०२४

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज

**MHKO100009522018**

**रे.क.नं. २०५/२०१८ मधील निशाणी क्र. ५९ वरील आदेश**

१. वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ४ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

३. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ४ बाबुराव लक्ष्मण उपराटे हे दिनांक १४/१०/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. प्रस्तुतकामी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब झालेला आहे. वादी यांनी प्रतिवादींचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. सबब वादी यांनी प्रतिवादी क्र. ४ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

४. प्रतिवादी यांनी सदरच्या अर्जास आपले म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकुर नाकारला आहे. वादीनी हेतुपुरस्सर विलंब केलेला आहे. सबब अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

५. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द वाटपाकरीता व कायम मनाई ताकीदीकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादी यांचा निशाणी क्र. ५८ वरील विलंब माफ होवून मिळणेसाठीचा अर्ज मंजूर करणेत

आलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत होणार आहे. म्हणून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक १८/०१/२०२४

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज

MHKO100009522018

## रे.क.नं. २०५/२०१८ मधील निशाणी क्र. ६० वरील आदेश

**१.** वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.४ बाबुराव लक्ष्मण उपराटे यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे.

**२.** वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**३.** वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ४ बाबुराव लक्ष्मण उपराटे हे दिनांक १४/१०/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. त्यांना अर्जात नमुद हेच सरळ व कायदेशिर वारस असून याशिवाय अन्य कोणीही वारस नाही.

**४.** प्रतिवादी यांनी सदरच्या अर्जास आपले म्हणणे दाखल योग्य तो आदेश पारीत करणेची विनंती केली आहे.

**५.** वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द वाटपाकरीता व कायम मनाई ताकीदीकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. वादी यांचा निशाणी ५८ ला वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेबाबतचे अर्ज व निशाणी क्र. ५९ वरील प्रतिवादी क्र. ४ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होवून मिळणेबाबतचा अर्ज मंजूर करण्यात आले आहेत . सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
२) वादी यांनी दाव्यात प्रतिवादी क्र. ४ यांच्या वारसाबाबत योग्य ती दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत सत्वर दाखल करावी.

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक १८/०१/२०२४

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज